माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ६१२/२०२२**

**अपिलार्थी, श्री. रामचंद्र मारोतराव बारंगे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्राम पंचायत, बोरी, ता. कारंजा (घा), जि. वर्धा**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं),**
**पंचायत समिती, कारंजा (घा), ता. कारंजा (घा), जि. वर्धा**

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २१.०६.२०२४**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १४.१२.२०२१ | निरंक | १९.०१.२०२२ | १५.०२.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) अन्वये दिनांक १४.१२.२०२१ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अर्ज सादर केले असून त्यात त्यांनी "ग्राम पंचायत कार्यालय बोरी यांच्या कार्यालयातर्फे, जानेवारी २०१९ ते आक्टोंबर २०२१ ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती द्वारे झालेल्या आर्थिक व्यवहाराच्या सत्यप्रती झेराक्स द्वारे प्रमाणित करुन देण्यात यावे" याबाबत माहिती मागितलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही. नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक १९.०१.२०२२ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे " माहिती न दिल्यामुळे " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५.०२.२०२२ रोजी सुनावणी दरम्यान, प्रस्तुत प्रकरणी अर्जदार / अपिलकर्ता यांना माहिती अर्जानुसार मागितलेली माहिती जन माहिती

अधिकारी ग्रामपंचायत, बोरी यांचेकडुन विनामुल्य पुरविण्यात यावी, असे आदेशीत करुन अपील निकाली काढण्यात येत आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे दिनांक ०७.०३.२०२२ रोजी " अपुर्ण माहिती दिल्यामुळे " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलांवर आज दिनांक २१.०६.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी ऑनलाईन पध्दतीने अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा सचिव, श्रीमती प्रियंका राऊत तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी श्री. कैलाश वानखेडे ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद दिला नसल्याचा आक्षेप नोंदवित दिनांक १९.०१.२०२२ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला व त्यावर दिनांक १५.०२.२०२२ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, कारंजा (घा), ता. कारंजा (घा), जि. वर्धा यांनी वरील माहिती विनामुल्य देण्याचे आदेश दिलेले आढळुन येतात. त्यानुसार अपिलार्थी यांनी जानेवारी २०१९ ते ऑगस्ट २०१९ तसेच सप्टेंबर २०२१ ते ऑक्टोबर २०२१, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती द्वारे झालेल्या आर्थीक व्यवहाराच्या कॅश बुकच्या छायांकित प्रती प्रदान करण्यात आल्या असल्याचे दाखल केलेल्या खुलाशात नमुद करण्यात आले आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढुन नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर * नागपूर *

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २१.०६.२०२४**

जावक क्रमांक 7180 दिनांक 4 OCT 2024